# <u>प्रेसनोट</u>

दि. १४/०२/२०२४

## महावितरण कार्यालय, सेनापती बापट रोड, पुणे येथील तंत्रज्ञावर लाच मागणी प्रकरणी कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर, गु.र.नं. १७०/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७. |
| तक्रारदार / फिर्यादी | पुरुष, वय ४० वर्ष. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | योगेश गोकुळ पाटील, पद – तंत्रज्ञ, महावितरण कार्यालय, सेनापती बापट रोड, पुणे (वर्ग-४) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २४,०००/- |
| पडताळणीमध्ये लाच मागणी रक्कम | २४,०००/- रुपये (चोवीस हजार रुपये) |

पडताळणी दिनांक :- ०६/१२/२०२३, दि. २४/०१/२०२४

गुन्हा दाखल दिनांक :- १४/०२/२०२४.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे बांधकाम व्यवसायिक असून त्यांनी करून दिलेल्या वास्तु नुतनीकरण इमारतीमध्ये वीज मीटर कमी पडत असल्याने त्याठिकाणी नवीन ४ वीज मीटर कनेक्शन घेणेकरीता व नवीन वीज मीटर जोडणीसाठी महावितरण कार्यालय, सेनापती बापट रोड कार्यालयात अर्ज केला होता. लोकसेवक योगेश पाटील यानी तक्रारदार यांचेकडे वरील कारणाकरीता व स्थळ पाहणी अहवालात त्रुटी न ठेवणेसाठी एका मीटरचे प्रत्येकी नवीन कनेक्शनसाठी ६,०००/- रु. प्रमाणे ०४ मीटरसाठी २४,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक योगेश पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे नवीन ४ वीज मीटर कनेक्शन व वीज मीटर जोडणीसाठी तसेच स्थळ पाहणी अहवालात त्रुटी न ठेवणेसाठी तडजोडीअंती पंचासमक्ष २४,०००/- रुपये (चोवीस हजार रुपये) लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विद्युलता चव्हाण तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.